नियमित दिवाणी दावा क्र.५/२०२०
पुष्पलता वि. प्रदिप
<u>**निशाणी क्र.१८**</u>

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.१ म्हणुन वादी क्र.१ पुष्पलता विजय दोसेवान यांची पूढील सरतपासणी वादींचे अधिवक्ता श्री.आर.ए.बागडे यांच्या मार्फत शपथेवर सुरु.</u>**

१५. मी माझ्या पुराव्याचे शपथपत्र् **नि.क्र.१८** वर दाखल केले असून ते माझ्या अधिवक्त्यांनी माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिले असून ते मी मराठी भाषेत वाचून व समजून घेतले आहे व त्यावर मी सही केली. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

१६. मी प्रतिवादीला दि.१४.०२.२०१९ रोजी नोंदणीकृत पोस्टाने माझ्या अधिवक्त्यांन मार्फत कायदेशीर नोटीस पाठविला होता. आता मला सदर नोटीसची स्थळप्रत दाखविण्यात आली. त्यावर माझे अधिवक्ता व आमच्या सहया आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर नोटीसला **नि.क्र.२३** देण्यात येते. सदर नोटीस पोस्टाने पाठविल्याबाबत पोस्टाची मुळ पावती अभिलेखावर दाखल केली असून त्याला **नि.क्र.२४** देण्यात येते. सदर नोटीस प्रतिवादीला प्राप्त झाल्याबाबत पोस्टाची मुळ पोचपावती अभिलेखावर दाखल केली असून त्याला **नि.क्र.२५** देण्यात येते.

१७. मी कागदपत्रांची यादी नि.क्र.२२ वर गुन्हा क्र.६४७/२०१८ या प्रकरणातील दोषारोपपत्राची प्रमाणित प्रत अभिलेखावर दाखल केली असून त्याला **नि.क्र.२६** देण्यात येते.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>उलटतपास–</u>**
**<u>प्रतीवादींच्या तोंडी विनंती वरुन उलटतपास पूढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात येते.</u>**

सा. वा. दा. अ. ब. अ. क.केले

समक्ष

(पी. आर. पाटील)
सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर,
नरखेड, जि. नागपूर

(पी. आर. पाटील )
सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर,
नरखेड, जि. नागपूर

दिनांक–१३.०३.२०२५

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते कि पुराव्याच्या सदर पि.डी.एफ. फाईलमधील मजकुर हा पुराव्याच्या मुळ प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

**लघुलेखकाचे नाव**– पी.एच. शिरभाते (श्रेणी–३)